# वनहक्क कायदा, २००६

वन हक्क कायदा, २००६ व त्यातील वन हक्क मान्यतेच्या प्रकियांविषयी थोडक्यात ......



कल्पवृक्ष, पुणे

# वनहक्क कायदा, २००६

कायदा कोणासाठी?

आदिवासी व जंगलावर अवलंबून असणाऱ्या इतर समुदायांसाठी

कायदा कशासाठी?

वननिवासींवर झालेला ऐतिहासीक अन्याय दूर करण्यासाठी व त्यांच्या जंगलावर असणाऱ्या पारंपारीक वन हक्कांना कायदेशीर मान्यता देण्यासाठी

जेथे जंगल जमिन आहे अशा कोणाचीही मालकी किंवा नियंत्रण असणाऱ्या वन जमिनींवर वन हक्क मिळतील.

अभयारण्य तसेच इतर संरक्षित क्षेत्रांमध्येही वन हक्क मागता येतात

परंतु, अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांमध्ये "अतिसंवेदनशील वन्य जीवांचे निवासस्थान (**CWH**)" बनविण्यासाठी लोकांच्या हक्कांवर काहीप्रमाणात किंवा पूर्णपणे निर्बंध येवू शकतात

परंतु **CWH** घोषित करण्या अगोदर त्याचा शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करणे व लोकांशी चर्चा करून ग्रामसभेचा लिखित ठराव घेणे बंधनकारक आहे

# या कायद्यानुसार कोणकोणते वन हक्क मान्य होतील?

मुख्यत: दोन प्रकारचे वन हक्क

अ) वैयक्तिक वन हक्क

ब) सामुदायिक वन हक्क

अ) वैयक्तिक वन हक्कामध्ये दोन प्रकारच्या हक्कांचा समावेश होतो.

जंगलातील जमिन शेतीकरता किंवा राहण्याकरीता वापरत असेल व त्यावर १३ डिसेंबर २००५ पर्यंत ताबा असेल तर ती जमिन मिळण्याचा हक्क (कलम ३ (१ (क))

जंगलावर असणारे सर्व पारंपारिक हक्क की ज्यामध्ये अकाष्ठ वनोपज, वाळलेले सरपण, मासे खेकडे गोळा करणे व गुरे चराईसारख्या हक्कांचा समावेश होईल. हे हक्क सामुदायिक वन हक्कांमध्ये नमूद केलेले आहेत. परंतु ते वैयक्तिकरीत्याही मागता येतात.

# ब) सामुदायिक वन हक्क

कलम ३ (१(ख, ग, घ, ङ, ज, झ, ञ, ट, ठ)) व कलम ३(२)

सामुदायिक वन हक्कांमध्ये खालील तीन प्रकारच्या वन हक्कांचा समावेश होतो

१. सामुदायिक वनसंसाधन हक्क (**CFR right**) (३(१(झ)))

२. सामुदायिक वन हक्क **(CF rights)** (३(१(ख, ग, घ, ङ, ज, ञ, ट, ठ)))

३. गाव विकास योजनांचा हक्क (३(२))

गाव समाज, संस्कृती, स्थानिक परंपरांना किंवा जंगल व वन्यजीवांच्या जीविताला धोका असणाऱ्या कोणत्याही विनाशकारी विकास कामाला विरोध करण्याची व प्रसंगी अशा प्रकारची विकासकामे होऊ न देण्याची ताकद या कायद्यामुळे स्थानिकांना मिळाली आहे

जंगल जमिनीवर कोणताही प्रकल्प किंवा विकासकामे करण्याच्या अगोदर तेथील लोकांची वन हक्क मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करणे आणि या कामांसाठी अगोदर ग्रामसभेची लिखित संमती घेणे बंधनकारक आहे.

# १. सामुदायिक वनसंसाधन हक्क (CFR right)

**गाव किंवा समुदाय जर पारंपारीकरित्या त्यांच्या सामुदायीक जंगलाचे संरक्षण व व्यवस्थापन करत असतील तर त्यांच्या या "सामुदायिक वन संसाधन/ CFR" चे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन करण्याचा हक्क (कलम ३(१(झ))**

पारंपारिकरीत्या संरक्षण करीत असेलेल्या **"सामुदायीक वन संसाधना" (CFR)** च्या बाबतीत निर्णय घेण्याचा क्रांतिकारक व महत्वपूर्ण हक्क या हक्काने समुदायाला दिलेला आहे

**जंगल व वन्यप्राण्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबतचा निर्णय घेण्याचा हक्क**

**जंगलाचे व्यवस्थापन करण्याचा व त्याबद्दलचे नियम बनवण्याचा हक्क**

**इमारती लाकूड वगळता इतर वन उत्पादनाच्या शास्वत वापरासाठी निर्णय घेण्याचा हक्क**

नियम ४(१(ङ)) नुसार ग्राम सभेने बनवलेल्या समितीने शास्वत व न्याय्य व्यवस्थापनासाठी "सामुदायिक वन संसाधनासाठीचा" संवर्धन व व्यवस्थापन आराखडा तयार करावयाचा आहे. त्यानंतर हा व्यवस्थापन आराखडा वन विभागाच्या सूक्ष्म आराखडा किंवा कार्यनियोजन आराखडा किंवा व्यवस्थापन आराखड्यामध्ये, समितीला आवश्यक वाटलेल्या बदलांसह, समाविष्ट करावयाचा आहे.

हा हक्क मिळाल्यानंतर संबंधीत वन जमिनीच्या व्यवस्थापनाचा हक्क पूर्णपणे ग्राम सभेकडे येतो. हा हक्क मिळाल्यानंतर सर्व सरकारी किंवा बिगर सरकारी (सध्या चालू असलेली किंवा नियोजीत असलेली) कामे, भाडेकरार किंवा वन कार्यनियोजन किंवा व्यवस्थापन आराखडा यांच्या अंमलबजावणीसाठी संबंधीतांना ग्राम सभेची संमती घ्यावी लागते.

# २. सामुदायिक वन हक्क (CF rights)

## सामुदायिक वन हक्कांमध्ये खालील वेगवेगळ्या हक्कांचा समावेश होतो

पूर्वीचे संस्थाने व जमिनदार यांच्या काळात वापरले जाणारे व कोणत्याही नावाने ओळखले जाणारे निस्तार हक्क (कलम ३(१(ख))

गावाच्या सीमेच्या आत व बाहेरील जंगलामधील अकाष्ठ (इमारती लाकूड सोडून इतर) वनोपजाची मालकी, गोळा करणे, वापरणे व त्याची विक्री किंवा त्यावर प्रक्रिया करुन विकण्याचा हक्क (मध, बांबू, वेत, खुरटी झाडी, फळे, तेंदू पत्ता, लाख, कंदमुळे, रानभाज्या, औषधी वनस्पती वगैरे) (कलम ३(१(ग))

मासे व पाण्यातील इतर उत्पादन मिळवण्याचा तसेच गुरे चराई व भटक्या जमातींचा हंगामी जंगल वापराचा हक्क (३(१(घ))

आदीम किंवा विशेष संवेदनशील जमाती व शेतीपूर्व समूह यांच्या निवासाचे व निवासस्थानाचे हक्क तसेच सामुदायिक धारणाधिकार. (कलम ३ (१(ङ))

सर्व वनगावे, जुनी वसतिस्थाने, व भूमापन न केलेली गावे यांची वसाहत करण्याचा व त्यांना महसूली गावात रुपांतर करण्याचा हक्क (३(१(ज))

कोणत्याही राज्य कायद्यानुसार किंवा जिल्हा परिषदेसारख्या स्वायत्त संस्थेच्या कायद्याने दिलेले किंवा कोणत्याही रुढीगत कायद्यानुसार दिलेले हक्क (३(१(ञ))

जैविक विविधतेचा वापर करणे व जैविक व सांस्कृतिक विविधतेशी संबंधीत असणाऱ्या समुदायाच्या पारंपारीक ज्ञान व बौद्धिक संपदेचा हक्क (३(१(ट))

वर नमूद न केलेले इतर सर्व पारंपारीक हक्क की ज्यामध्ये जंगलातील पायवाटा, देवाची ठिकाणे, गुरे व पिण्यासाठीचे पाणी वगैरेसारखे इतर सामुदायिक वन हक्क येतील. (३(१(ठ))

आदिवासी किंवा इतर पारंपारीक वनवासींना त्यांच्या वन जमिनींवरुन १३ डिसें २००५ पूर्वी अवैधरीत्या पुनर्वसन किंवा हाकलून दिले असेल तर त्यांचे पर्यायी जमिनींसह मूळ स्वरुपात पुनर्वसन करण्याचा हक्क

# ३. गाव विकास योजनांचा हक्क

**पुढील गाव विकास योजनांसाठी (१ हेक्टर पर्यंतची जमीन की ज्यात ७५ पेक्षा जास्त झाडे तुटणार नाहीत) वनजमिन मिळण्याचा हक्क (कलम ३(२))**

१. शाळा

२.दवाखाना व हॉस्पीटल

३.रेशन दुकान

४.टेलिफोन व वीजेच्या तारा

५.टाक्या व अन्य किरकोळ पाणवठे

६.पिण्याचे पाणी व पाईपलाईन

७.छोटे कालवे/ पाट

८.पाणी व पावसाचे पाणी साठवण व्यवस्था

९.अपारंपारीक उर्जेचे स्त्रोत

१०.तांत्रिक प्रशिक्षण व कौशल्यविकास वर्ग

११.आंगणवाडी

१२.रस्ते

१३.समाज भवन (केंद्र)

बहुतेक वेळा या गाव विकास योजनेच्या हक्कालाच सामुदायिक वन संसाधन (CFR) व सामुदायिक वन (CF) हक्क समजले जाते. परंतु वरील तीनही हक्क हे वेगवेगळ्या स्वरुपाचे आहेत हे लक्षात ठेवावे.

# हे वन हक्क मान्य करण्यासाठी व त्याची प्रक्रिया चालवण्यासाठी काही समित्या बनवल्या जातात




गावामध्ये → ग्राम सभा व वन हक्क समिती




तालुक्यामध्ये → उप– विभाग स्तरीय समिती




जिल्ह्यामध्ये → जिल्हा स्तरीय समिती




राज्यामध्ये → राज्य स्तरीय संनियंत्रण समिती

## गाव/ वाडी/ पाड्यामध्ये वन हक्क मान्यतेची प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी ही ग्राम सभेची आहे आणि त्यासाठी ग्राम सभेला खालील कामे पार पाडावी लागतात

वन हक्क समितीची निवड करणे व तिच्यामार्फत लोकांकडून पुराव्यांसह वन हक्कांचे दावे मागवणे

वन हक्कांसाठी दावे केलेल्या लोकांच्या नावांच्या यादीचे रजिस्टर ठेवणे

संबंधीत व्यक्तींचे, समुहांचे व सरकारी यंत्रणांचे म्हणणे ऐकून घेवून वन हक्क दाव्यांसंबंधी ठराव पारीत करणे

कायद्याच्या कलम ४ (२(ङ)) नुसार पुनर्वसनाचे तयार केलेले पॅकेज विचारात घेवून त्यावर योग्य तो निर्णय घेणे.

कायद्याच्या कलम ५ व नियम ४(१(ङ)) अनुसार जंगल, वन्यजीव व जैवविविधतेच्या संरक्षणासाठी समिती बनवणे आणि तिच्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे

वन व्यवस्थापन आराखडा/प्लॅन मध्ये बदल, ट्रान्झीट परवाना व वनोपजातून मिळालेल्या उत्पन्न वापराच्या बाबतीतील समितीने घेतलेल्या निर्णयांना मान्यता देणे

# गावामध्ये वन हक्क समितीची निवड कशी करावी?



ग्रामपंचायत ही प्रत्येक गावाची/ वाडीची ग्रामसभा बोलावून कमित कमी १० व जास्तीत जास्त १५ सदस्यांच्या वनहक्क समितीची निवड करेल



समितीचे ६६% सदस्य हे आदिवासी असतील तसेच समितीमध्ये ३३% महिला सदस्य असणे बंधनकारक आहे. जिथे आदिवासी सदस्य नसतील तिथे त्यांच्या ६६% प्रमाणाच्या ३३% सदस्य महिला असाव्यात.



ग्राम सभेच्या बैठकीसाठी ग्राम सभेच्या निम्म्या सदस्यांची उपस्थिती गरजेची आहे. तसेच सभेसाठी ३३% महिला उपस्थित असणे बंधनकारक आहे.

समिती आपल्या सदस्यांमधून अध्यक्ष व सचिवाची निवड करेल. समितीचा सचिव समिती सदस्यांच्या नावाच्या यादीसह समिती स्थापनेविषयीची माहिती उपविभाग स्तरीय समितीला कळवेल

# वन हक्क समितीची कामे

लोकांकडून पुराव्यांसह वन हक्कांचे दावे मागवणे

वन हक्कांच्या दाव्यांची तपासणी करुन काही उणीवा असतील तर संबंधितांना कळवणे.

गरज भासल्यास वन हक्काचा अर्ज भरण्यासाठी व पुरावे गोळा करण्यासाठी मदत करणे

वन हक्क दाव्यांची पडताळणी करणे

पडताळणीचे निष्कर्श वन हक्क दाव्यांसोबत जोडून ग्राम सभेत सादर करणे व त्यावर ग्रामसभेचा ठराव घेणे.

सर्व वन हक्क दावे ग्राम सभा ठरावासोबत उपविभाग स्तरीय समितीकडे पाठवणे

# प्रांत/ उपविभाग स्तरीय समितीची रचना

| | |
|---|---|
| प्रांत/ उपविभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| सहाय्यक उपवनसंरक्षक | सदस्य |
| जिल्हा परिषदेने नेमलेले ३ पंचायत समिती सदस्य की ज्यातील २ आदिवासी असतील (तीनपैकी एक महिला). जिथे आदिवासी नसतील तिथे इतर पारंपारीक वन निवासी समुदायातील सदस्यांची नेमणूक केली जाईल. | सदस्य |
| आदिवासी विभागाचा उपविभागीय स्तराचे काम पाहणारा अधिकारी | सचिव |

# प्रांत/ उपविभाग स्तरीय समितीची कामे

नष्ट होत चाललेल्या वनस्पती, प्राणी तसेच जंगल व जैवविविधता संरक्षण व संवर्धनासंबंधात वनहक्क धारकांच्या जबाबदाऱ्यांसंबंधी ग्रामसभेला माहिती पुरवणे

ग्रामसभा व वनहक्क समित्यांना वन व महसूली नकाशे आणि मतदार याद्या पुरवणे.

ग्रामसभेने पारीत केलेले ठराव, दिलेले नकाशे एकत्रित करून तपासणे.

वन हक्कांच्या व्याप्ती व स्वरूपासंदर्भातील ग्रामसभांमधील विवादांची सुनावणी करणे व निर्णय देणे.

ग्रामसभेच्या ठरावामुळे व्यथीत झालेल्या व्यक्तींच्या अर्जांची सुनावणी करणे

शासनाच्या नोंदीशी मेळ घातल्यानंतर वनाधिकारांच्या तालुक्यानुसार नोंदी करून अंतिम निर्णयासाठी जिल्हा स्तरीय समितीकडे पाठवणे.

कायदा व नियमांमध्ये दिलेल्या उद्दिष्टांविषयी व पध्दती विषयी स्थानिक वन निवासी लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे.

दाव्यांचे अर्ज लोकांना पुरेसे व मोफत उपलब्ध आहेत याची खात्री करणे.

आवश्यक गणपूर्तीनुसार ग्रामसभेच्या बैठकी मुक्त वातावरणात व प्रामाणिकपणे चालवल्या जात आहेत याची खात्री करणे

# जिल्हा स्तरीय समितीची रचना

| | |
|---|---|
| जिल्हा अधिकारी | अध्यक्ष |
| उपवनसंरक्षक | सदस्य |
| जिल्हा परिषदेने नेमलेले ३ जिल्हा परिषद सदस्य की ज्यातील २ आदिवासी असतील (तीनपैकी एक महिला). जिथे आदिवासी नसतील तिथे इतर पारंपारीक वन निवासी समुदायातील सदस्यांची नेमणूक केली जाईल. | सदस्य |
| आदिवासी विभागाचा जिल्ह्याचे काम पाहणारा अधिकारी | सचिव |

# जिल्हा स्तरीय समितीची कामे

नियम ६ (ख) नुसार ग्रामसभा व वन हक्क समित्यांना आवश्यक असणारी माहिती पुरवण्यात आली आहे याची खात्री करणे

कायद्याचे उद्दिष्ट लक्षात ठेवून सर्वांच्या, विशेषतः आदिम आदिवासी समूह, भटके समूह व गुराखी समूहांच्या वन हक्क मागण्यांना संबोधीत करण्यात आले आहे का याची तपासणी करणे

उपविभाग स्तरीय समितीने पाठवलेले वन हक्क दावे व त्यासोबतचे दस्तावेज विचारात घेवून त्यांना अंतिम मान्यता देणे.

उपविभाग स्तरीय समितीचा निर्णय मान्य नसणाऱ्या व्यक्तिंकडून आलेल्या अपिलावर सुनावणी करणे

आंतरजिल्हा मागण्यांसंबंधात इतर जिल्ह्यांसोबत समन्वय साधणे

मान्य झालेल्या वन हक्कांचा इतर सरकारी दस्तावेजांमध्ये समावेश करण्यासाठी निर्देश देणे

वन हक्कांचा समावेश केलेले दस्तावेज प्रसिध्द होतील याची खात्री करणे

वन हक्क व मालकी हक्क दस्तावेजांच्या प्रमाणीत प्रती संबंधीत व्यक्तीला व ग्राम सभेला पुरवण्यात आल्या आहेत याची खात्री करणे.

# राज्य स्तरीय संनियंत्रण समितीची रचना

| | |
|---|---|
| मुख्य सचिव | अध्यक्ष |
| सचिव, महसूल विभाग | सदस्य |
| सचिव, आदिवासी विकास विभाग किंवा समाज कल्याण विभाग | सदस्य |
| सचिव, वन विभाग | सदस्य |
| प्रधान मुख्य वन संरक्षक | सदस्य |
| सचिव, पंचायत राज | सदस्य |
| जमाती सल्लागार परिषदेचे अध्यक्षाद्वारे निवडलेले तीन आदिवासी सदस्य व जेथे अशी परिषद नसेल तेथे राज्य शासनाने निवडलेले आदिवासी सदस्य | सदस्य |
| आयुक्त, आदिवासी कल्याण | सचिव |

# राज्य स्तरीय संनियंत्रण समितीची कामे

वन हक्कांना मान्यता देण्याच्या प्रक्रियेचे संनियंत्रण करण्याचे निकष व निर्देशक तयार करणे.

राज्यातील वन हक्कांना मान्यता व त्यांची पडताळणी करण्याच्या प्रक्रियेचे संनियंत्रण करणे.

राज्यातील वन हक्क मान्यता प्रक्रियेचे संनियंत्रण करण्यासाठी कमित कमी तीन महिन्यांतून एकदा बैठक घेवून त्याबद्दलचा अहवाल केंद्र सरकारला पाठवणे

कायद्याच्या कलम ८ मध्ये नमूद केलेल्या नोटीशी प्राप्त झाल्यावर अशा प्राधिकरणांवर योग्य ती कारवाई करणे

वन हक्क मान्यता व पडताळणीच्या प्रक्रियेचा सहामाही अहवाल तयार करुन तसेच आवश्यक ती कागदपत्रे नोडल एजन्सीला (आदिवासी मंत्रालय, भारत सरकार) पाठवणे

कायद्याच्या कलम ४ (२) अनुसार सांगितलेल्या पुनर्वसन प्रक्रियेचे संनियंत्रण करणे

कायद्याच्या कलम ३ (१(ड)) व ४(८) नुसार पुनर्वसनाशी संबंधीत प्रक्रियेचे संनियंत्रण करणे

# वन हक्काची मागणी करावी लागते, ते आपोआप मिळत नाहीत

१) वैयक्तिक वन हक्क (**IF rights**)
२) सामुदायीक वन हक्क (**CF rights**)
३) सामुदायीक वन संसाधन हक्काच्या (**CFR Right**)

यांच्या मागणीसाठी खालील वेगवेगळे अर्ज करावे लागतात

वैयक्तिक वन हक्कासाठी ➡ फॉर्म "क" **(A)**

सामुदायीक वन हक्कासाठी ➡ फॉर्म "ख" **(B)**

सामुदायीक वन संसाधन हक्क ➡ फॉर्म "ग" **(C)**

वरील फॉर्म प्रांत / उपविभागीय कार्यालय व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांमार्फत मोफत पुरवण्यात येतात

गाव विकास योजनांना वन जमिन मिळणे साठी (कलम ३(२)) ग्राम सभा ठराव पारीत करुन संबंधीत सरकारी खात्यामार्फत योजना मंजूर करुन घेईल. त्यानंतर संबंधीत सरकारी यंत्रणा तो प्रकल्प प्रस्ताव ग्रामसभेच्या ठरावासोबत संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी किंवा उपवनसंरक्षक यांचेकडे सादर करेल.

# या दाव्यांसोबत जोडावे लागणारे पुरावे

**आदिवासींसाठी जातीचा दाखला देणे आणि इतर परंपरागत वनवासींसाठी कोणत्याही वनामध्ये १३ डिसें २००५ पूर्वी ७५ वर्षांपासून रहिवासाचा पुरावा देणे गरजेचे आहे. दावा दाखल करत असलेल्याच वनजमिनीवर ७५ वर्षे रहिवासाचा पुरावा देण्याची गरज नाही.**

यात्यतिरिक्त खालीलपैकी कोणतेही दोन पुरावे देणे गरजेचे आहे

## वैयक्तिक हक्कासाठी लागणारे पुरावे

- गावातील वडिलधाऱ्या व्यक्तीचा लेखी जबाब
- गॅझेटीयर, जनगणना, सर्वे, सेटलमेंट रिपोर्ट, नकाशे, सॅटेलाईट इमेजरी, सूक्ष्म आराखडा, कार्यनियोजन आराखडा, वन व्यवस्थापन आराखडा, वन चौकशी अहवाल, इतर वन दस्तावेज, वन हक्क नोंदी, पट्टा किंवा भाडे पट्टा, सरकारी समित्या व आयोगाचे रिपार्ट, सरकारी आदेश व अध्यादेश, दिशा-निर्देश, सर्क्युलर, ठराव, अधिसूचना इ.
- मतदान ओळखपत्र, पासपोर्ट, रेशन कार्ड, डोमेसाईल प्रमाणपत्र, घर पट्टी,
- घर, झोपडी तसेच सपाटीकरण, बांध बंदिस्ती, पाझर तलाव यासारखी प्रत्यक्ष जमिनीवर केलेली कामे
- न्यायालयीन आदेश व निर्णयासारखे दस्तावेज
- मानववंश शास्त्र सारख्या नामांकित संस्थांनी केलेली संशोधने, वनाशी संबंधित रुढी व परंपरांचे व रूढीगत कायद्याचे दस्तावेज
- राजे महाराजे व त्यांसारख्या राज्यकर्त्यांच्या वेळेतील नकाशे, वन हक्क, वन सवलती इ. सारखे कोणतेही दस्तावेज
- पवित्र ठिकाणे, विहिरी व दफनभूमी सारख्या प्राचीन काळातील खुणा

## सामुदायिक हक्कासाठी चे पुरावे

- निस्तार पत्रक, सामुदायिक गुरे चराईच्या, फळे, रान भाज्या, औषधी वनस्पतीं सारखे गौण वनोत्पादन गोळा करण्याच्या, मासे पकडण्याच्या जागा, सिंचनाच्या (इरीगेशन) पद्धती, गुरे व माणसांसाठी पाणी वापराच्या जागा
- समुदायाने बांधलेल्या प्रचीन ठिकाणांचे अवशेष, पवित्र झाडे, देवराया, पवित्र तळी किंवा नदीची ठिकाणे, स्मशानभूमी/ दफनभूमी
- सरकारी दस्तावेज किंवा सध्याच्या राखीव जंगलाचे पूर्वीचे असणारे वर्गिकरण (संरक्षित जंगल/ गुरे चराई क्षेत्र/ गावाची सार्वजनिक भूमी/ निस्तारी जमिन वगैरे)
- पूर्वीच्या किंवा सध्याच्या पारंपारीक शेती करण्याच्या पध्दती

कायद्याच्या नियमांमध्ये स्पष्ट केले आहे की उपविभाग व जिल्हा स्तरीय समित्यांनी वरील पुराव्यांखेरीज दंड पावती, प्राथमिक वन गुन्हे रीपोर्ट, अतिक्रमणधारकांची यादी सारख्या विशिष्ट पुराव्यांसाठी आग्रह धरु नये किंवा ही कारणे सांगून दावा नामंजूर करु नये.

# वन हक्क मान्यतेसाठीची प्रक्रिया काय आहे?

ग्राम सभा वन हक्क समितीला वन हक्क दावे मागवण्यासाठी अधिकृत करेल. दावे मागविलेल्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत वन हक्क दावे दाखल करावयाचे आहेत. ग्राम सभा गरज वाटल्यास हा कालावधी वाढवू शकते.

वन हक्क समितीने अर्ज मागविल्यानंतर गावकरी वैयक्तिक आणि सामुहिक वन हक्क मागणीचा अर्ज पुराव्यांसहीत वनहक्क समितीकडे सादर करतील

समिती सर्वांच्या सोयीची तारिख ठरवेल आणि प्रत्यक्ष जागेवर जावून पहाणी करुन दाव्यांची पडताळणी करेल

समिती ग्रामसभा बोलावून दाव्यांसंदर्भातील निष्कर्ष सभेसमोर मांडून त्याबाबतचा ग्रामसभेचा ठराव घेईल

समिती ग्रामसभा ठरावासोबत सर्व अर्ज उपविभागीय समितीकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवेल.

उपविभागीय समिती सर्व अर्जांची पडताळणी करुन निष्कर्षांसह ते अर्ज जिल्हा समितीकडे पाठवेल.

या समितीस अर्ज नामंजूर करण्याचा अधिकार नाही. कागदपत्राच्या पूर्ततेसाठी किंवा पुनर्पडताळणीसाठी दावा ग्रामसभेस परत पाठवला जाईल. किंवा तो दावा योग्य त्या निष्कर्षांसहित जिल्हा समितीकडे पाठवला जाईल

जिल्हा समिती वनहक्क पूर्णपणे किंवा काही अंशी मान्य किंवा अमान्य करण्याचा निर्णय घेईल.

# वैयक्तिक वन हक्क मान्यतेची प्रक्रियेतील काही ठळक मुद्दे

वन हक्क समितीने वन हक्क दावे पडताळणीसाठी हजर राहण्यासाठीचे पत्र वन व महसूल विभागाला पाठवावे. या दोनही विभागाचे अधिकारी पडताळणीच्या वेळेस उपस्थित राहतील.

ग्राम सभेने दावा मंजूर केल्यानंतर जर वन व महसूल विभागाने दावा पडताळणी वेळेस त्यांचे अधिकारी उपस्थित नव्हते अशी हरकत घेतल्यास दाव्याची पडताळणी पुन्हा करण्यात येईल. परंतु दुसऱ्या वेळेसही त्यांचे अधिकारी उपस्थित न राहिल्यास ग्राम सभेचा पडताळणीबाबचा ठराव अंतिम राहील.

ग्राम सभेने दाव्यात काही बदल केल्यास किंवा दावा नामंजूर केल्यास किंवा उपविभागीय स्तरीय समितीने जर दाव्यात बदल करण्याची किंवा दावा नामंजूर करण्याची शिफारस जिल्हा स्तरीय समितीकडे केली असेल तर हा निर्णय संबंधितांना कळवणे बंधनकारक आहे जेणेकरुन त्यांना पुढे उप विभागीय किंवा जिल्हा स्तरीय समितीकडे ६० दिवसांच्या आत अपिल करता येईल.

दावा मंजूर करण्यासाठी जर ग्राम सभा व उपविभागीय स्तरीय समितीनेही शिफारस केली असेल परंतु जिल्हा स्तरीय समितीने जर असा दावा नामंजूर केल्यास त्याची सविस्तर कारणे नोंद करुन संबंधीत व्यक्तिला व्यक्तिशः कळवणे बंधनकारक आहे.

ग्राम सभेने पारीत केलेले ठराव किंवा दाव्यांबाबत केलेल्या शिफारसी जर अपूर्ण असतील किंवा त्यांना आणखी निरिक्षणाची गरज आहे असे भासल्यास उप विभागीय किंवा जिल्हा स्तरीय समिती दाव्यांमध्ये काही बदल करणे किंवा ते नामंजूर करण्याऐवजी असे दावे ग्राम सभेकडे पुनर्तपासणीसाठी परत पाठवतील

वन हक्क मान्यतेची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर वन व महसूल विभाग पट्टा दिलेल्या जमिनीचा अंतिम नकाशा तयार करुन त्याची नोंद ३० दिवसांच्या आत वन व महसूल विभागाच्या दस्तावेजामध्ये (रेकॉर्ड) करतील.

ग्राम सभा ठरावामध्ये किंवा उपविभाग स्तरीय समितीने जिल्हा स्तरीय समितीकडे केलेल्या शिफारसींमध्ये दाव्यात बदल करणे किंवा ते नामंजूर करण्याबद्दलचे निर्णय असतील तर ते सर्व निर्णय संबंधीत व्यक्तिला कळवावेत. तांत्रिक बाबी पाळल्या गेल्या नाहीत म्हणून कोणताही दावा फेटाळता येणार नाही.

उपविभाग व जिल्हा स्तरीय समितीने दाव्यांबाबत निर्णय घेताना नियम १३ मध्ये नमूद केलेल्या पुराव्यांनाच गृहीत धरणे बंधनकारक आहे. त्याव्यतिरीक्त विशिष्ठ अशा पुराव्यांबद्दल (जसे की दंड पावती, अतिक्रमण धारक यादी, गुन्हे अहवाल वगैरे) आग्रह धरु नये. सॅटेलाईट इमेजरी सारख्या तांत्रिक बाबींचा उपयोग पुरवणी म्हणून केला जाऊ शकतो परंतु त्यास दाव्यासोबत जोडलेल्या इतर पुराव्यांच्या ऐवजी वापरता येणार नाही

# सामुदायीक वन संसाधन (CFR) हक्क दावा करण्याची प्रक्रिया काय आहे?

वन हक्क समिती ही ग्राम सभेच्या वतीने सामुदायीक वन संसाधन हक्काचा (अर्ज "ग") दावा दाखल करेल

सामुदायीक वन संसाधन हक्कासाठी दावा करण्याची प्रक्रिया सुरु करण्याची तारीख निश्चित करुन दावा केले जाणारे वन क्षेत्र जर शेजारील गावे वापरत असतील तर त्यांना या दाव्याबद्दलची कल्पना द्यावी

ज्यांना गावांच्या सीमांबद्दल अचूक माहिती आहे अशा गावातील वयस्क व्यक्तींना सोबत घेवून सामुदायीक वनांच्या सीमा/ हद्दी निश्चित करणे

सामुदायीक वन संसाधनाचा वेगवेगळी महत्वाची ठिकाणे (व सीमा दाखवणारा नकाशा तयार करणे (जी.पी.एस. यंत्राचा वापर करु शकतो. परंतु कोणतेही यंत्र न वापरता साधा हाताने तयार केलेला नकाशाही दाव्यासोबत जोडू शकतो)

शक्य झाल्यास गाव नकाशा, वन नकाशा, टोपोशीट, सॅटेलाईट इमेजरी यांसारखे नकाशेही जोडावेत (हे नकाशे महसूल व वन विभागाने उपलब्ध करून द्यायचे आहेत)

फॉर्म "ग" (C) भरून त्यासोबत वर नमूद केलेले नकाशे आणि नियम १३ (२) मध्ये सांगितलेले कोणतेही दोन पुरावे जोडावेत

समिती दाव्याची पडताळणी करुन त्याबद्दलचा निष्कर्श अहवाल तयार करेल

ग्राम सभा बोलावून त्यामध्ये समितीच्या पडताळणी निष्कर्षावर चर्चा करुन ठराव पारित करावा

दावा व समितीच्या पडताळणी निष्कर्श ग्रामसभा ठरावासोबत जोडून उपविभागीय स्तरीय समितीकडे पाठवावा.

या हक्कामध्ये संरक्षित वन, राखीव वन, अभायारण्य व राष्ट्रीय उद्यानांचा समावेश होईल. तसेच हा हक्क समुदायाच्या जंगल वापर, संवर्धन व व्यवस्थापन करण्याच्या हक्कांना व शक्तींना मान्यता देतो.

# सामुदायीक वन हक्क मान्यतेच्या प्रक्रियेतील काही ठळक मुद्दे

आदिम किंवा विशेष संवेदनशील जमातींच्या (जात पंचायत सारख्या) पारंपारीक समाजव्यवस्थेशी किंवा संस्थांशी विचारविनिमय करुन अशा सर्व प्रकारच्या समुदायांना निवासस्थानाचे हक्क तसेच सामुदायिक धारणाधिकार हक्क मिळण्यासाठी दावे करणे व ते हक्क त्या समुदायांना मिळतील याची खात्री जिल्हा स्तरीय समिती करेल.

कायद्याच्या कलम ३(१(घ)) च्या अनुषंगाने भटके तसेच गुरे चराई करणाऱ्या समाजांचे वन हक्क दावे संबंधित ग्राम सभांकडे दाखल करण्याच्या प्रक्रियेला जिल्हा स्तरीय समिती चालना देऊन ती प्रक्रिया सुलभ होण्यासाठी मदत करील

कायद्याच्या कलम ३(१(झ)) मध्ये नमूद केलेल्या सामुदायीक वन संसाधन हक्काला वने असलेल्या सर्व गावांमध्ये मान्यता मिळतील याची खात्री जिल्हा स्तरीय समिती करेल.

ज्या गावांमध्ये सामुदायीक वन संसाधन हक्क मिळाले नसतील किंवा ते मिळण्यासाठी दावा केला गेला नाही तर तसे का झाले नाही याची सविस्तर कारणे जिल्हा स्तरीय समितीच्या सचिवांनी नोंद करुन ठेवावीत.

कायद्याच्या कलम ३ (१(ज)) नुसार सांगितलेल्या वन गावांचे किंवा भूमापन न झालेली गावे किंवा वस्त्या यांचे महसूली गावांमध्ये रुपांतर करताना ते गाव वापरत असलेल्या सर्व प्रकारच्या जमिनी समाविष्ठ करुन घ्याव्यात. तसेच यामध्ये गावाच्या सध्याच्या व भविष्यकाळातील सामुदायिक सुविधांसाठी (शाळा, दवाखाने वगैरे) लागणाऱ्या जमिनीचाही समावेश असावा.

# दाव्यांची पडताळणी करताना गाव वन हक्क समितीने खालील गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे

दाव्यात नमूद केलेल्या ठिकाणाला प्रत्यक्ष भेट देवून त्याची व्याप्ती व स्वरुप तपासावे. तसेच दावेदाराकडून किंवा साक्षीदाराकडून आणखी पुरावे व दस्तावेज स्वीकारणे

भटके व धनगर/ गुराखी समाजाकडून आलेले दावे त्यांच्या उपस्थितीमध्ये योग्य तऱ्हेने पडताळणी होत आहेत याची खात्री करणे

आदीम जमाती व शेतीपूर्व समुदायांकडून आलेले दावे त्यांच्या उपस्थितीमध्ये योग्य रीतीने पडताळणी केले जात आहेत याची खात्री करणे

वन हक्क दाव्यामध्ये नमूद केलेले क्षेत्र इतर ग्राम सभा वापरत असतील किंवा त्यांच्यामध्ये हद्दींबद्दल वाद असतील तर समिती ही त्या त्या गावातील वन हक्क समिती सोबत बैठका घेऊन त्याबद्दलची लिखित माहिती संबंधितांना कळवेल.

# या कायद्यामध्ये वन हक्कांसोबतच हे हक्क धारण करणाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांचाही (कलम ५) समावेश केलेला आहे

१.जंगल वन्यजीव आणि जैवविविधतेचे संरक्षण करणे

२.वन्यजीव, वन संरक्षण तसेच सामुदायीक जंगला बाबत ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांचे पालन करणे

३.वनाातील पाण्याची ठिकाणे व पर्यावरणाच्या दृष्टीने अतिसंवेदनशील ठिकाणांचे संरक्षण करणे

४. वन निवासींचे निवासस्थान व सांस्कृतीक आणि नैसर्गिक वारसा यांचे संरक्षण करणे

जबाबदाऱ्यांचे पालन करण्यासाठी आणि जंगल, वन्यजीव व जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी ग्राम सभा एक समिती बनवेल (नियम ४(१(ङ))

## समितीची कामे

सामुदायीक वन संसाधन तसेच वन्यजीव व जैवविविधतेचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन करणे.

सामुदायीक वन संसाधनाच्या संवर्धन व व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन आरखडा (मॅनेजमेंट प्लान) बनवणे

समितीने बनवलेल्या व्यवस्थापन आराखड्याला योग्य त्या सूचनांसह वन विभागाच्या सूक्ष्म नियोजन आराखड्यामध्ये समाविष्ठ करणे

# ग्रामसभा, उपविभाग व जिल्हा स्तरिय समितीचा निर्णय मान्य नसल्यास त्यांच्या विरोधात अपिल करता येते

ग्रामसभेविरोधात ⇨ उपविभाग स्तरीय समितीकडे

उपविभाग समिती विरोधात ⇨ जिल्हा स्तरीय समितीकडे अपिल करता येते

## उपविभाग स्तरीय समितीकडे करावयाचा अपिल अर्जाबाबत –

ग्राम सभेचा निर्णय मान्य नसलेल्या व्यक्तींना ६० दिवसांच्या आत उप विभाग स्तरीय समितीकडे अपिल करता येते

उपविभाग स्तरीय समिती अपिलावर सुनावणी करण्यासाठी एक तारीख ठरवून संबंधीत व्यक्तीला व ग्राम सभेला १५ दिवस अगोदर लेखी कळवेल तसेच याबद्दलची नोटीस गावामध्येही सार्वजनिक ठिकाणी लावेल

उपविभाग समिती अपिल दाखल करुन घेईल किंवा फेटाळील किंवा ग्राम सभेकडे पुनर्विचारासाठी परत पाठवेल.

हा पुनर्विचारासाठीचा प्रस्ताव आल्यानंतर ग्रामसभा ३० दिवसांच्या आत बैठक बोलावून अपिल दाखल करणाऱ्याचे म्हणणे ऐकून घेईल आणि पुनर्विचारासाठी आलेल्या प्रस्तावावर योग्य तो ठराव पारीत करुन तो उपविभाग स्तरीय समितीकडे पाठवेल.

ग्राम सभेचा ठराव विचारात घेवून उपविभाग स्तरीय समिती अपिल स्वीकारल्याचा किंवा ते फेटाळल्याचा योग्य तो आदेश देईल.

प्रलंबित अपिल अर्जांना बाधा न आणता, उपविभाग स्तरीय समिती, अन्य मागणीदारांच्या वन हक्कविषयक दस्तावेज तपासून व पडताळून पाहील व तो संबंधीत उपविभागीय अधिकाऱ्याद्वारे जिल्हा स्तरीय समितीला पाठवेल.

दोन किंवा अधिक ग्रामसभांमध्ये वाद असल्यास कोणत्याही ग्राम सभेने केलेल्या अर्जानुसार किंवा उपविभागीय समिती स्वतः अशा ग्रामसभांची एकत्रीत बैठक बोलावेल. यातून जर ३० दिवसांच्य आत परस्पर संमतीने तोडगा न निघाल्यास ग्रामसभांचे म्हणने ऐकून घेवून उपविभाग स्तरीय समिती योग्य तो निर्णय देऊन आदेश देईल.

# जिल्हा स्तरीय समितीकडे करावयाचा अपिलाबाबत

उपविभाग स्तरीय समितीचा निर्णय मान्य नसलेल्या व्यक्ती ६० दिवसांच्या आत जिल्हा स्तरीय समितीकडे अपिल करतील

जिल्हा स्तरीय समिती अपिलावर सुनावणी करण्यासाठी एक तारीख ठरवून संबंधीत व्यक्तीला व उपविभाग स्तरीय समितीला १५ दिवस अगोदर लेखी कळवेल तसेच याबद्दलची नोटीस गावामध्येही सार्वजनिक ठिकाणी लावेल

जिल्हा स्तरीय समिती अपिल दाखल करुन घेईल किंवा फेटाळील किंवा उपविभागीय समितीकडे पुनर्विचारासाठी परत पाठवेल.

हा पुनर्विचारासाठीचा प्रस्ताव आल्यानंतर उपविभाग स्तरीय समिती अपिलकर्त्या व्यक्तीचे व ग्रामसभेचे म्हणणे ऐकून आणि या प्रस्तावावर निर्णय घेऊन त्याबद्दल जिल्हा समितीस कळवेल.

त्यानंतर जिल्हा स्तरीय समिती अपिल अर्ज विचारात घेऊन अर्ज स्वीकारल्याचा किंवा फेटाळल्याचा आदेश देईल.

जिल्हा समिती सरकारी दस्तावेजांमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्यांसाठी दावेदारांचे वन हक्क दस्तावेज जिल्हा अधिकारी किंवा जिल्हा आयुक्तांकडे पाठवेल.

दोन किंवा अधिक उपविभाग स्तरीय समित्यांच्या आदेशांमध्ये विसंगती आढळल्यास जिल्हा स्तरीय समिती स्वतः अशा उपविभाग स्तरीय समित्यांची एकत्रीत बैठक बोलावेल. यातून परस्पर संमत तोडगा न निघाल्यास उपविभाग स्तरीय समित्यांचे म्हणने ऐकून घेवून जिल्हा स्तरीय समिती योग्य तो निर्णय देऊन आदेश काढेल.

# संकटग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीवांचे वसतिस्थान/ **CWH** म्हणजे काय?

वन हक्क कायद्यानुसार अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांचे अतिसंवेदनशील असे भाग वन्यजीवांच्या संवर्धनासाठी **"संकटग्रस्त/ अतिसंवेदनशील असे वन्य जीवांचे वसतिस्थान" किंवा क्रिटीकल वाईल्ड लाईफ हॅबिटाट (CWH)** म्हणून घोषित केले जातील

अशा क्षेत्रांमधील मानवाच्या वन हक्कांवर काही प्रमाणात किंवा पूर्णपणे निर्बंध येवू शकतात. कदाचित येथून लोकांचे विस्थापनही केले जावू शकते

परंतु, कोणत्याही वन हक्क धारकाच्या वन हक्कांवर काही गोष्टी पूर्ण केल्याशिवाय निर्बंध येवू शकणार नाहीत किंवा त्याचे पुनर्वसन केले जाऊ शकत नाही

# CWH बनविण्या आधी खालील गोष्टी पूर्ण करणे बंधनकारक आहे

CWH बनवण्यासाठी अगोदर ग्राम सभेची लेखी संमती घेणे

असे क्षेत्र घोषीत करण्याच्या ठिकाणातील सर्व वन हक्क मान्यतेची व ते हक्क जंगलवासीयांना देण्याची प्रक्रिया पूर्ण करणे

वन्य प्राण्यांच्या जीवाला व त्यांच्या वसतीस्थानाला जंगलवासीयांची कृती व त्यांच्या वन हक्कांमुळे कधीही भरुन न निघणारा धोका पोहचत आहे असे शास्त्रीय व सखोल आभ्यासाद्वारे सिद्ध करणे

अशा क्षेत्रात वन्य प्राणी व मानव एकत्र रहू शकत नाही अशासारखे निष्कर्ष राज्यशासनाने काढलेले असल्यास

पुनर्वसन आराखडा तयार करुन त्याची माहिती लोकांना देणे. हा आराखडा त्या समुदायांना निश्चित अशा उपजीविका पुरवणारा तसेच केंद्र सरकारचे पुनर्वसनाचे निरनिराळे कायदे व धोरणे यांचा योग्य वापर करुन संबंधीत समुदायांची गरज भागवणारा असावा.

पुनर्वसनासाठीचे क्षेत्र निश्चित करणे आणि पुनर्वसन व त्यासंबंधीत सर्व बाबींबद्दल संपूर्ण माहिती ग्रामसभेला देऊन लेखी संमती घेणे बंधनकारक आहे.

पुनर्वसनाच्या आराखड्याप्रमाणे पर्यायी जमिनी व इतर सोई सुविधा दिल्याशिवाय कोणालाही विस्थापित केले जाणार नाही.

# CWH बनविण्याची प्रक्रिया काय आहे?

वन हक्क कायद्यामध्ये CWH बनविण्याच्या प्रक्रियांविषयी सविस्तर माहिती किंवा मार्गदर्शक सूचना दिलेल्या नाहीत मात्र यामध्ये खालील तीन टप्पे नमूद करण्यात आले आहेत

पर्यावरण व वन मंत्रालय हे संबंधित भागातील स्थानिक तज्ञांचा व आदिवासी मंत्रालयाचे प्रतिनिधींचा समावेश असलेली तज्ञ समिती बनवेल

↓

पर्यावरण व वन मंत्रालय हे संबंधित तज्ञ समितीशी खुल्या चर्चा व सल्लामसलत करुन CWH ची निवड करेल

↓

निवडलेल्या CWH ची शेवटची अधिसूचना काढली जाईल

परंतु ही सर्व प्रक्रिया सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सूचना (गाईडलाईन्स) बनवल्याशिवाय स्पष्ट होत नाही. तसेच अशा प्रकारची मार्गदर्शक सूचना बनवण्याची प्रक्रिया वन व पर्यावरण मंत्रालयामध्ये अजूनही चालू आहे. त्यामुळे या मार्गदर्शक सूचना आल्याशिवाय कोठेही CWH बनवण्याची प्रक्रिया चालवणे बरोबर नाही

वन हक्क कायदा हा आदिवासी व जंगलावर अवलंबून असणाऱ्या इतर पारंपारीक वन निवासींच्या वन हक्कांना कायदेशीर मान्यता देण्यासाठीचा कायदा आहे. वन हक्क कायदा, २००६, नियम २००८ व सुधारीत नियम २०१२ यांच्या तरतुदींना व वन हक्क मान्यतेच्या प्रक्रियांना सोप्या भाषेमध्ये मांडण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न या पुस्तिकेमध्ये केला गेला आहे. तसेच ही पुस्तिका तयार करताना आदिवासी मंत्रालय, भारत सरकार , यांनी कायद्याच्या काही तरतूदींबद्दल वेळोवेळी दिलेल्या स्पष्टीकरणांचाही आधार घेण्यात आला आहे. जेणेकरुन स्थानिक वन निवासींना व त्यांच्यासोबत काम करणाऱ्या विविध सरकारी व बिगर सरकारी संस्था किंवा संघटनांना वन हक्क कायदा समजणे व त्याची अंमलबजावणी करणे कामी मदत होईल. यामध्ये अनावधानाने काही त्रुटी किंवा चुका राहून गेल्या असतील तर कृपया आम्हांस त्याबद्दल कळवावे की जेणेकरुन त्या दुरुस्त करता येतील.

टीप: हि पुस्तिका वन हक्क कायदा आणि वन हक्क मान्यतेची प्रक्रिया समजून घेण्यासाठी तयार केली गेली आहे. परंतु, कायद्याच्या तरतुदींच्या तपशीलवार माहितीसाठी मूळ कायदा व त्यांच्या नियमांचा वापर करावा.

प्रकाशक: कल्पवृक्ष, अपार्ट. ५ श्री दत्त कृपा, ९०८ डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ फोन: ९१–२०–२५६७५४५०, २५६५४२३९

इ–मेल: **kvoutreach@gmail.com**

वेबसाईट: **www.kalpavriksh.org**

डिझाईन व शब्दांकन: प्रदीप चव्हाण

सहकार्य: नीमा पाठक, मिलिंद वाणी, मीनल तत्पति

आर्थिक सहकार्य: मिजेरीओर, आचेन, जर्मनी

मुद्रक: मुद्रा, पुणे